# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

**EPABX:** 0253-2539100-300, **Fax:** 0253-2539171, **Phone:** 0253-2539173

**Website** : www.muhs.ac.in, **E-mail :** sw@muhs.ac.in

**डॉ. कालिदास द. चव्हाण** | **Dr. Kalidas D. Chavan**

एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र) | M.B.B.S. M.D. (Forensic Medicine)

**प्र.कुलसचिव** | **Offg. Registrar**


मआविवि/एसडब्ल्यू/स्कीम/५.२/ १४५४ /२०१७ दिनांक: २३ /०६/२०१७

"परिपत्रक क्र. ८/२०१७"

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म. आ. वि. वि. नाशिक.

विषय : धन्वंतरी विद्याधन योजनेबाबत...

महोदय/ महोदया,

धन्वंतरी विद्याधन योजनेचे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये गरीब, गरजु, हुशार व पदवी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत मागविण्यात येत आहेत.

धन्वंतरी विद्याधन योजनेत ज्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाकरीता बॅंकेकडून संपुर्ण कर्ज एकदाच उचललेले असेल किंवा मंजूर झालेल्या कर्जापैकी दरवर्षी कर्ज हप्त्याची रक्कम उचललेली असेल, अशा सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्रवेश क्षमतेच्या नियमित १० % पदवी शिक्षण घेणाऱ्या व ५ % पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी योजना लागू आहे. ज्या विद्यार्थ्यांनी बॅंकेकडून शैक्षणिक कर्जाची उचल केली असेल अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामार्फत विद्यापीठास दि.१५/०८/२०१७ पर्यंत प्रस्ताव सादर करावे.

धन्वंतरी विद्याधन योजनेचा लाभ सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पाहोचविण्यासाठी सर्व संलग्नित महाविद्यालयांना योजनेची माहिती असणारे पोस्टर पाठविण्यात आले आहेत. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी सदर योजना महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवयाची आहे.

महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त नियमावली अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालयांच्या कव्हरींग लेटरसह दि.१५/०८/२०१७ पर्यंत विद्यापीठात स्विकारण्यात येतील. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठीची नियमावली सोबत जोडत आहे. उशिरा तथा विलंबाने प्राप्त झालेल्या कोणत्याही प्रस्तावावर विद्यापीठ कार्यवाही करणार नाही. तसेच योजने

सबंधीचे प्रस्ताव अर्ज/कागदपत्रे विद्यार्थी कल्याण विभागात परस्पर स्वीकारले जाणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

सदर योजनेचा लाभार्थी विद्यार्थ्यांना कशा प्रकारे फायदा झाला व सदर योजना कशाप्रकारे राबविली गेली याबाबतचा अभिप्राय (फिडबॅक) फॉर्म महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी योजना संपल्यांनर भरुन पाठवावयाचा आहे. (सहपत्र "क" व "ड" ) विद्यापीठाच्या योजना हया विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत आहे, त्यांचा हक्क नाही असे त्यांना अवगत करण्यात यावे. तसेच सर्व अटी व शर्तीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखीव ठेवलेले आहेत.

वर नमूद केलेल्या योजनेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे राखुन ठेवण्यात आले आहेत. योजनाबाबतचा तपशील विद्यापीठाच्या www.muhs.ac.in (Departments Students' Welfare Dept. Circular) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वा/-
प्र. कुलसचिव

प्रत माहितीस्तव : १) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक
४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक
५) सर्व विभागीय कार्यालये, मआविवि, नाशिक

सोबत : धन्वंतरी विद्याधन योजना नियमावली

## - धन्वंतरी विद्याधन योजना नियमावली -

१) सदर योजनेचा लाभ पदवी व पदव्युत्तर नियमित, मागील वर्षात उत्तीर्ण झालेल्या, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येईल.तसेच खालील प्रमाणे निकष धारण करणाऱ्या (अ.क्र.अ ते ड) विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.

अ) आंतरवासियता (Internship)

ब) दुसऱ्या देशात वास्तव्य असलेले (Non Resident Indian - NRI)

क) परराज्यातून आलेले (Other than Maharashtra State - OMS)

ड) व्यवस्थापन कोटयातून NRI कोटयात प्रवेश घेतलेले

२) विद्यार्थ्यास भारत सरकार/शासनाच्या किंवा अन्य संस्थाकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप शुल्क परतावा, फी सवलत किंवा इतर काही अनुदान मिळत असले तरी देखील सदर विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पात्र ठरविण्यात यावे. या करीता विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्याची आवश्यकता नाही. तसेच ज्या विद्यार्थ्यांना हया योजनेचा लाभ घ्यावयाचा नाही त्यांचेकडून तसे लिहून विद्यापीठास कळवावे. (सोबत सहपत्र "इ" जोडले आहे) असे केल्याने प्रत्येक विद्यार्थ्यां पर्यंत धन्वंतरी विद्याधन योजना पोहचवता येईल.

३) विद्यार्थ्यांनी शिक्षणाकरीता बॅंकेकडून संपुर्ण कर्ज एकदाच उचलेले असेल किंवा मंजूर झालेल्या कर्जापैकी दरवर्षी कर्ज हप्त्याची रक्कम उचललेली असेल, अशा सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्रवेश क्षमतेच्या नियमित १० % पदवी व ५ % पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी योजना लागू असेल.

४) ज्या विद्यार्थ्याच्या पालकांची १२ महिन्यांची उत्पन्नाची कमाल मर्यादा रुपये ६ लक्ष असेल असे विद्यार्थी योजनेचा लाभ घेऊ शकतील. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करताना ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. विद्यापीठाच्या दरवर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीनुसार अनुदान वाटपाची कमाल मर्यादा रु. २०,०००/- आहे.

५) महाविद्यालयाकडुन प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांना व्याज अनुदानाचे परीगणना (calculation) करण्यासाठी विद्यार्थ्याने ०१ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ (मागील वित्तीय वर्ष) या कालावधीत शैक्षणिक कर्जावर बॅंकेन आकारलेले व्याज ग्राहय धरण्यात येईल.

६) शिक्षणशुल्क समितीने महाविद्यालयासाठी आकारावयाचे शुल्क विचारात घेऊन विद्यार्थ्याने १२ महिन्यांच्या कालावधीमध्ये ज्या महिन्यात शैक्षणिक कर्ज घेतले असेल, तो महिना सोडून त्याच्या पुढील महिन्यापासुन कर्ज रक्कमेवरील व्याज रकमेची परिगणना आर्थिक वर्ष २०१६-१७ म्हणजे ३१ मार्च २०१७ पर्यंत करण्यात येईल. शैक्षणिक कर्जाच्या व्याजाचे अनुदान देतांना शिक्षण शुल्क समितीचे चालु वर्षाचे शिक्षण शुल्क ग्राहय धरले जाईल नसल्यास मागील वर्षाचे शिक्षण शुल्क समितीचे शिक्षण शुल्क ग्राहय धरण्यात येईल. ज्या महाविद्यालयांना शिक्षण शुल्क समितीने शुल्क घोषित केलेले नाही तेथे विद्यार्थ्यांनी घेतलेल्या कर्ज रक्कमेवरील व्याज रकमेची परिगणना करण्यात येईल. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी त्याच्या शैक्षणिक प्रवेशानंतर एक रकमी कर्ज उचल केली असेल तरी त्या विद्यार्थ्यांना चालु आर्थिक वर्षात व्याज रकमेची परीगणना करुन व्याज रक्कम देण्यात येईल.

७) प्रस्तावासोबत सादर केलेल्या बॅंक स्टेटमेंटमध्ये किंवा बॅंक व्यवस्थापकांच्या पत्रामध्ये प्रत्यक्ष आकारण्यात आलेला व्याज दर किंवा जास्तीत जास्त १५% व्याजदर या पैकी जो कमी असेल

त्या दराने कर्ज रक्कमेवरील व्याजाची परिगणना करण्यात येईल.

## खालील बार्बीची नोंद घेण्यात यावी

१) विद्यार्थ्यांनी सादर केलेला प्रस्ताव अपुर्ण असेल किंवा निर्धारीत मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही. तसेच फॅक्स व ई-मेलव्दारे आलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही. प्रस्तावा संबंधी विद्यार्थ्यांनी किंवा पालक यांच्याकडून प्राप्त तक्रारीची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयांवर राहील.

२) सादर केलेल्या दस्तऐवजांमध्ये कालांतराने कोणतेही कागदपत्र खोटे असल्याचे सिध्द झाल्यास संबधीत विद्यार्थ्यावर कायदयानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

३) योजनांचा लाभ घेताना लाभार्थी विद्यार्थी जबाबदार असेल व किंबहूना त्यापेक्षाही अधिक जबाबदारी महाविद्यालयांच्या अधिष्ठाता / प्राचार्यांची असेल.

४) विद्यार्थ्यांनी ज्या बॅंकेकडून कर्ज घेतले आहे अशा संबंधीत बॅंकेच्या नावे व्याज अनुदानाची रक्कम धनाकर्षाव्दारे संबंधीत विद्यार्थ्यांना प्राचार्यांमार्फत वाटप करण्यात येईल.

## विद्यार्थ्याने प्रस्तावा सोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे

१) विद्यार्थ्याचा प्राचार्यानी साक्षांकीत केलेला नमुना अर्ज (सहपत्र "अ")

२) व्यवस्थापकांच्या सही शिक्कासह विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या नमुन्यातील बॅंकेचे पत्र (सहपत्र "ब")

३) गतवर्षी पास झालेल्या परिक्षेच्या गुणपत्रकाची अधिष्ठाता/प्राचार्य यांची साक्षांकित प्रत.

४) पालकांच्या उत्पन्नाचा गतवर्षाचा दाखला (सक्षम अधिकारी यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला - फक्त तहसीलदारांचा दाखला) इतर कोणत्याही प्रकारचा दाखला ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

५) मंजूर झालेल्या कर्जापैकी प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेल्या कर्जाचा व कर्जावरील व्याजदरासह होणाऱ्या व्याज रक्कमेचा उल्लेख असावा.

६) दि. ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ या कालावधीचे बॅंकेचे मुळ स्टेटमेंट आवश्यक आहे.

टिप :- महाविद्यालयाने प्रस्तावांची पुर्तता करतांना तपासणी सूची प्रमाणे दस्तावेज तपासून अनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (सहपत्र "अ")

नमुना अर्ज

धन्वंतरी विद्याधन योजना

पासपोर्ट
आकाराचा
फोटो

प्रति,

मा. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग,

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,

नाशिक.

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | |
| २ | विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव व पत्ता | |
| ३ | मोबाईल नंबर / दुरध्वनी क्र. (STD) कोडसह | |
| ४ | इमेल आयडी (email) | |
| ५ | विद्यार्थ्याचा कायम निवासी पत्ता | |
| ६ | जन्म तारीख व वय | |
| ७ | सध्या शिकत असलेला वर्ग आणि कोर्स | |
| ८ | महाविद्यालयात शिकत असलेल्या वर्गाचे आकारण्यात आलेले शैक्षणिक शुल्क | |
| ९ | गतवर्षी उत्तीर्ण वर्ग व गुण (गुणपत्राची प्रत जोडावी) | |
| १० | मागासवर्गीय असल्यास प्रकार<br>(होय असल्यास जातीच्या दाखल्याची प्रत जोडावी) | होय / नाही वर्गवारी : |
| ११ | शारिरीक अपंगत्व असल्यास (होय असल्यास अंपगत्वाच्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी) | होय / नाही |
| १२ | विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ? | होय / नाही |
| १३ | पालकांचे संपूर्ण नाव | |
| १४ | पालकांशी विद्यार्थ्यांचे नाते | |
| १५ | पालकांचा संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्र. (STD) कोडसह/ मोबाईल क्रमांक : | |
| १६ | पालकांचा व्यवसाय / नोकरी | |
| १७ | पालकांचे वार्षिक उत्पन्न (तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला सोबत जोडावा.) | |
| १८ | पालकांची नोकरी / व्यवसायाचा पत्ता | |
| १९ | विद्यार्थ्याच्या आधारकार्डचा नंबर नमूद करावा<br>(आधारकार्डची छायांकीत प्रत जोडणे अनिवार्य) | |

विद्यापीठाच्या धन्वंतरी विद्याधन योजनेनुसार उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कर्जावरील व्याज रकमेचे अनुदान मिळावे म्हणून मी इच्छुक असून कृपया सदर योजनेचा लाभ मला मिळावा. तथापि मला सन.................. (वर्ष नमुद करावे) या शैक्षणिक वर्षामध्ये या योजनेचा लाभ मिळालेला आहे/नाही.

धन्वंतरी विद्याधन योजनेच्या सर्व अटी व शर्ती जाणून घेतल्या आहेत व त्यांचे पालन करणे माझेवर बंधनकारक राहील हे मी मान्य करतो/करते.

सही दिनांकासह :

विद्यार्थ्याचे नाव :

महाविद्यालयाचा शिक्का

अधिष्ठाता/प्राचार्याची सही

नमुना अर्ज (सहपत्र "ब")

# ON BANK LETTER HEAD

प्रति,
मा. संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग,
मआविवि, नाशिक.

विषय : शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या परताव्याबाबत...

संदर्भ : विद्यापीठाची धन्वंतरी विद्याधन योजना.

| क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | बॅंकेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्र. | |
| २. | बॅंक राष्ट्रीयकृत / शेडयूल बॅंक / सहकारी बॅंक / खासगी बॅंक किंवा इतर कोणती बॅंक आहे. | |
| ३. | कर्ज घेतलेल्या विद्यार्थ्याचे नाव | |
| ४. | महाविद्यालयाचे नाव | |
| ५. | शिकत असलेला वर्ग व अभ्यासक्रम | |
| ६. | बॅंकेने मंजूर केलेले कर्ज व दिनांक | अक्षरी रु.<br>अंकी रु. दि. |
| ७. | ०१ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ पर्यंत बॅंकेने मंजूर केलेल्या कर्जापैकी वाटप केलेली रक्कम | अक्षरी रु.<br>अंकी रु. |
| ८. | ०१ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ दरम्यान भरलेल्या व्याजाची रक्कम व व्याजाचा दर | व्याज दर : %<br>व्याजाची होणारी रक्कम<br>अक्षरी रु. :<br>अंकी रु. : |

बॅंकेचा शिक्का

बॅंक मॅनेजरची स्वाक्षरी

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
Maharashtra University of Health Sciences, Nashik

# Student's Welfare Department

## Feed back – Suggestion form

1) College Name :- _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

2) College Employee Name & Designation:-_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

3) Mobile No.:-_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

4) Email-id:-_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

5) Scheme Information :- ☐ Excellent ☐ Very Good ☐ Good ☐ Normal

6) Was the College aware of this information regarding Scheme? Y/N

7) What was the response for Scheme from Student and why?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

8) Suggestion regarding better Scheme Implementation.

Note: - Kindly be Specific

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

Maharashtra University of Health Sciences, Nashik

# Student's Welfare Department

## Feed back – Suggestion form

1) Student Name :- _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

2) College Name:-_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

3) Mobile No.:-_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

4) Email-id:-_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

5) Scheme Information :- ☐ Excellent ☐ Very Good ☐ Good ☐ Normal

7) Wether you were aware of this information regarding Scheme. Y/N

8) Did you like this Scheme and why?

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

9) Was this Scheme helpful to you?If yes do explain.

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

10) Suggestion regarding better Scheme Implementation.

Note: - Kindly be Specific

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

(सहपत्र "इ")

अधिष्ठाता/प्राचार्य ————————————————————————————

आपणास कळवू इच्छितो/इच्छिते की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक मार्फत धन्वंतरी विद्याधन योजनेची माहिति परिपत्रकाद्वारे मिळाली आहे. सदर योजनांची माहिति सर्व विद्यार्थ्यांपर्यंत कळविण्यात आलेली आहे. खालील योजनेमध्ये सहभागी होऊ इच्छित नसणा-या विद्यार्थ्यांची यादी नाव/सहीसह पाठविण्यात येत आहे.

स्थळ : सही

College Seal

दि. / /२०१७

मा. अधिष्ठाता/प्राचार्य

## Name of Scheme : Dhanvantari Vidyadhan Yojana

| Sr. No. | Name of Student | Course | Signature of Student |
|---|---|---|---|

(सहपत्र "ई")

# तपासणी सुची (Check List)

| अ.क्र. | सादर करावयाची कागदपत्रे | होय/नाही | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेला सहपत्र “अ”(नमुना अर्ज ) परिपुर्ण भरला आहे काय ? | | |
| २ | बॅंक स्टेटमेंट सहपत्र “ब”(नमुना अर्ज ) (१ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७) जोडले आहे काय ? | | |
| ३ | गतवर्षात उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रकाची (अधिष्ठाता/प्राचार्य यांचे साक्षांकीत प्रत) साक्षांकीत प्रत जोडली आहे काय ? | | |
| ४ | गतवर्षाचा उत्पन्नाच्या दाखल्याची साक्षांकीत प्रत (आर्थिक वर्ष - २०१५-१६) जोडली आहे काय ?(फक्त तहसिलदारांचा दाखला) | | |
| ५ | आधारकार्ड ची साक्षांकीत प्रत | | |

टिप :- महाविद्यालयाने प्रस्तावांची पुर्तता करतांना तपासणी सूची प्रमाणे दस्तावेज तपासून अनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.

**College Clerk**
**Mob. No.**

**Dean/Principal**
**(signature & Stamp)**